## नियमीत दिवाणी दावा नं.२१०/२०२४ मधील नि. २७ खालील आदेश

(सुनिता भडंगे वि. सिताराम भडंगे इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द दावा दाखल केला असून सदर दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र. १ , ३ ते ५ यांना बजावणी झालेली आहे. यातील प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांना कायदयाचे ज्ञाने नसल्यामुळे व यातील कांही प्रतिवादी हे परगावी राहणेस असल्यामुळे त्यांना वकीलांशी संपर्क करुन कैफियत म्हणणे वेळेत देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देणेस सुमारे १ महिनेचा विलंब झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीचा असल्यामळे व सदर मिळकतीत प्रस्तुत प्रतिवादी यांचा हक्क गुंतलेला असल्यामुळे सदरचा विलंब माफ होवून प्रतिवादी यांचा कैफियत व म्हणणे स्वीकारणे न्यायाचेकामी आवश्यक व जरुरीचे आहे. सदरचा विलंब रद्द झाल्यास दाव्याचा गुणांगुणावर निर्णय देणेस मदत होणार आहे. याउलट सदरचा विलंब रदद न केल्यास प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे न स्वीकारल्यास प्रस्तुत प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे अपरिमीत नुकसान होणार आहे. तरी प्रतिवादी यांना कैफियत देणेस झालेला ०१ महिन्याचा विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, प्रतिवादी यांनी विलंब माफीच्या अर्जात दिलेले म्हणणे पुर्णपणे लबाडीचे व फसवेगिरीचे आहे. समन्सची बजावणी वेळेत होवून त्याचा रिपोर्ट वेळेत आलेला आहे, जे अर्जात आहे ते पुर्णपणे खोटे व लबाडीचे आहे. तरी प्रतिवादी यांनी दिलेला विलंब माफीचा अर्ज नामंजूर व्हावा. यदाकदाचित सदरचा अर्ज मे.कोर्ट मंजूर करण्याच्या मतास आल्यास रु. ५०००/- कॉस्ट करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ व ३ ते ५ यांना दि. ०९.०५.२०२४ रोजी दाव्याचे समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ हे दाव्याकामी दि.२५.०६.२०२४ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. वास्तविक प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स मिळालेपासून तेथून पुढे त्यांनी ३० दिवसांच्या आत किंवा त्यापुढे ६०

दिवसांच्या आत असे एकूण ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे गरजेचे होते. कायद्याप्रमाणे कैफियत दाखल करणेची मुदत ९० दिवसांनी संपते. अभिलेखावर असे दिसून येते की दिनांक १७/०५/२०२४ रोजी माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादी क्र. १ , ३ ते ५ यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित केलेला आहे. प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ व ३ ते ५ यांना दि. ०९.०५.२०२४ रोजी दाव्याचे समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ हे दाव्याकामी दि.२५.०६.२०२४ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. त्यासोबतच त्यांनी कैफियत देणेस विलंब माफीचा अर्ज दिल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता दिनांक ०९/०८/२०२४ पर्यंत कैफियत दाखल करण्याचा कालावधी असल्याचे दिसून येते. तरी देखील प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक असलयाने प्रतिवादीचा सदरचा अर्ज न्यायनिर्णयीत करणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.२८ खाली शपथपत्र दाखल केले आहे. दावा गुणदोषावर चालण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य होईल. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नि.२७ मंजूर करण्यात येतो.

KANCHAN BABASAHEB SONAWANE

Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE
Date: 2024.07.23 11:13:24 +0530

( **के. बी. सोनवणे** )

दि. १९/०७/२०२४.

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgement/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | G.L.Sutar |
| **(b)** | Court | **:-** | K.B.Sonawane<br>2nd Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 19/07/2024. |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 23/07/2024. |